स्थापना : १५ जुन १९५९

कार्यालय क्र. - ०२४६६-२२३४४६

आमचे प्रेरणास्थान



मातोश्री मुक्ताई धोंडगे

आमचे श्रध्दास्थान



## विद्या हेच जीवन । अविद्या हेच मरण ।।

# श्री शिवाजी कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स

शिवाजी नगर, कंधार जि. नांदेड -४३१७१४

स्थापना : १५ जुन १९५९

## : संस्थापक व संचालक :

**डॉ. भाई केशवरावजी धोंडगे साहेब**

(ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, माजी खासदार व आमदार )

## उज्वल यशाची परंपरा

## ६६ वर्षे

# माहिती पत्रक - २०२५-२६

## आमचे प्रेरणास्थान



मातोश्री मुक्ताई धोंडगे

## आमचे श्रध्दास्थान



**डॉ. भाई केशवरावजी धोंडगे साहेब**

ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी  माजी खासदारव  आमदार
श्री  शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी ता. कंधारचे संस्थापक व संचालक

## : आमचे मार्गदर्शक :



**डॉ. भाई गुरूनाथराव कुरूडे साहेब**

ज्येष्ठ  स्वातंत्र्य सैनिक माजी आमदार तथा सचिव
श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी ता. कंधार

## : आमचे मार्गदर्शक :



**आदरणीय ॲड. मुक्तेश्वररावजी धोंडगे साहेब**

सहसचिव
श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी ता. कंधार

## : आमचे मार्गदर्शक :



**डॉ. भाई पुरूषोत्तमरावजी धोंडगे साहेब**

व माजी जिल्हा परिषद सदस्य
श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष

# वंदे मातरम्

वंदे मातरम्

सुजलाम् सुफलाम् मलयज शीतलाम्

सस्यशामलाम् मातरम् ।। वंदे मातरम् ।।

शुभ्रज्योत्स्ना पुलकित यामिनीम् ।

फुल्लकुसुमित-द्रुमदलशोभिनीम् ।

सुहासिनीम् सुमधुर भाषिणीम्

सुखदाम वरदाम् मातरम् ।। वंदे मातरम् ।।

हे राष्ट्रीय गीत महाराष्ट्र विधी मंडळाच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सामुदायिकरीत्या गाऊनच विधी मंडळाचे सत्र सुरू करण्याची महान थोर राष्ट्रीय परंपरा मुक्ताई सुताच्या अथक प्रयत्नाने सुरू झाली. हेच ते साकारलेले मन्याडखोरी महान विजयाचे राष्ट्रभक्तीचे ज्वलंत प्रतिक !

जय शिवराय ! जयक्रांति ! जय मुक्ताई !

विद्या हेच जीवन ! अविद्या हेच मरण !!

# श्री शिवाजी मोफत एज्यूकेशन सोसायटी,

ता.कंधार जि.नांदेड.

संस्थापक व संचालक : आदरणीय डॉ.भाई केशवरावजी शंकरराव धोंडगे

**ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, माजी खासदार व आमदार**

स्थापना दि.१९५९



आमचे श्रध्दास्थान



आमचे प्रेरणास्थान

## संस्थेचे कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १) | आदरणीय डॉ.भाई केशवरावजी शंकरराव धोंडगे | संस्थापक व संचालक |
| २) | मा.प्रा.डॉ.पुरुषोत्तमराव केशवरावजी धोंडगे | अध्यक्ष |
| ३) | मा.श्री माधवराव माणिकराव पा.पेठकर | उपाध्यक्ष |
| ४) | मा.श्री गुरुनाथराव माणिकराव कुरुडे | सचिव |
| ५) | मा.ॲड.मुक्तेश्वरराव केशवरावजी धोंडगे | सहसचिव |
| ६) | मा.श्री ज्ञानोबाजी हरी गायकवाड | खजानदार |
| ७) | मा.श्रीमती पार्वतीबाई श्रीरामजी गरुडकर | सदस्या |
| ८) | मा.श्री मारोतराव गंगाराम जायभाये | सदस्य |
| ९) | मा.प्रा. वैजनाथराव माणिकराव कुरुडे | सदस्य |
| १०) | मा.प्रा.शंकरराव राजेश्वरराव आंबटवाड | सदस्य |
| ११) | मा.ॲड.संदीप शरदराव गव्हाणे | सदस्य |
| १२) | मा.श्री जावेद अहेमदखान मगदुम अहेमदखान | सदस्य |
| १३) | मा.श्री गुरुनाथ विठ्ठलराव पा.पेठकर | सदस्य |
| १४) | मा.प्राचार्य अशोकराव बळीराम पा.गवते | पदसिध्द सदस्य |
| १५) | मा.प्राचार्य डॉ.धनंजय माणिकराव पा.पवार | पदसिध्द सदस्य |

# श्री शिवाजी कॉलेज, कंधार विषयी थोडक्यात माहिती

महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यात कंधार या राष्ट्रकुट कालीन राजधानीच्या ऐतिहासिक तालुक्यात अतिशय मागासलेल्या दुर्गम, डोंगराळ, भूभाग असलेल्या मन्याड व पार्वती नदीच्या खोऱ्यात ज्ञानदानाचे कार्य करण्यासाठी व घरची भाकर खाऊन गोरगरीबांच्या वाडी, तांड्यावरील मुला, मुलींना शिक्षण घेता यावे यासाठी मातोश्री मुक्ताई यांच्या प्रेरणेतुन ''विद्या हेच जीवन । अविद्या हेच मरण'' हे ब्रीद वाक्य समोर ठेवून जून १९५९ मध्ये श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीची स्थापना संस्थापक व संचालक, जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी माजी खा. व आमदार डॉ. भाई केशवरावजी धोंडगे साहेब यांनी केली. श्री शिवाजी कॉलेज कंधारच्या स्थापनेपूर्वी कंधार व लोहा भागातील गोरगरीबांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी त्यांनी एक ऐतिहासिक शपथ श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सोनखेडच्या स्थापनवेळी कार्यक्रमा प्रसंगी मुख्यमंत्री मा. ना. यशवंतरावजी चव्हाण साहेब व उदघाटक मा. ना. शंकररावजी चव्हाण साहेब यांच्या उपस्थितीत शपथ घेतली. ''आधी लगीन कॉलेजचे मग लग्न केशवाचे'' या क्रांतिकारी शपथेचा आदर्श समोर ठेवून संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंत ज्ञानादानाचे कार्य अविरत सुरू आहे. या संस्थेसाठी जमीन दानशुर विठामाय वडगावे धानोरकर यांच्याकडून दान मिळाली. परंतु महाविद्यालय चालवण्यासाठी आर्थिक ताण कायम होता. या काळात शासनाकडे आर्थिक सहकार्याची मागणी केली होती. पण त्या काळी राधाबाई दुधगावकर यांच्या लोकनाट्यमंडळाने संस्थेला मदत करण्यासाठी नाट्यमंडळाचे प्रयोग करून आर्थिक मदत केली. तसेच जनतेकडून प्रतिसाद मिळू लागला. महाविद्यालयाच्या स्थापनेनंतर मराठवाडा विद्यापीठाने १९६४ ला कॉलेजची पाहणी करण्यासाठी डॉ. आर.एस. गुप्ते कमिशन पाठविले होते. त्यांच्या अहवालानुसार अनुकूल, प्रतिकूल चर्चा होऊन कॉलेजची मान्यता काढून घेण्यात आली. ही घटना संस्थेसाठी अत्यंत दुःखाची होती. ही बातमी मातोश्रीच्या कानावर पडली तेव्हा मातोश्री गंभीर आजारी होत्या. भाई केशवरावजी धोंडगे यांना म्हणाल्या की, मी तुझ्या एकट्याची आई आहे. परंतु ही संस्था गोरगरीबांच्या मुलांची आई आहे. माझा विचार न करता तु मुंबईला जाऊन संस्थेची मान्यता आन, असा सल्ला दिला. संस्थेला मान्यता मिळवण्यासाठी भाई डॉ. केशवरावजी धोंडगे साहेब व गुरूनाथरावजी कुरूडे साहेब यांनी मुंबईला गेले. भाई डॉ. केशवरावजी धोंडगे साहेब यांच्या मातोश्री मुक्ताई प्राणप्रिय असलेल्या त्या आजारी अवस्थेत होत्या व प्रकृती साथ देत नव्हती. परंतु कॉलेजची मान्यता मिळावी ही मातोश्री मुक्ताईची आंतरीक इच्छा होती. ही मातोश्रीची तळमळ लक्षात घेऊन मा. डॉ. केशवरावजी धोंडगे साहेबांनी व गुरूनाथरावजी कुरूडे साहेबांनी मुंबई गाठली. व कॉलेजला महाराष्ट्र शासनाकडून परत मान्यता मिळवली. त्यावेळी मुख्यमंत्री मा. ना. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांनी आर्थिक मदत देऊन सहकार्य केले. ही आनंदाची बातमी बहाद्दरपुरा गावापर्यंत पोहचली. परंतु गावाकडे केशवरावचे आगमन होण्यापूर्वीच मातोश्रीची प्राणज्योत मालवली. मात्र माय लेकराची शेवटची भेट होऊ शकली नाही. याचे शल्य भाई डॉ. केशवरावजी धोंडगे साहेब यांनी अनेक वेळा भावना व्यक्त केली.

केशवरावांनी भावी पिढ्यांसाठी तेजोमय प्रकाश मिळवला. पण त्यांच्या वैयक्तिक जीवनातील मात्र छाया विरून गेली. श्री शिवाजी मोफत एज्यूकेशन सोसायटीच्या स्थापनेत मातोश्री मुक्ताईचा खुप मोठा त्याग, बलिदान राहिले आहे. याच त्यागातून कंधार व लोहा तालुक्यात ग्रामीण भागात वाडी तांड्यावर शाळा करून शिक्षणाची दारे खुली केली.

प्रतिकुल परिस्थितीवर मात करत भाई डॉ. केशवरावजी धोंडगे साहेब यांनी कॉलेज नव्या जोमाने सुरू करून शैक्षणिक कार्याला प्रारंभ केला. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री ना. श्री वसंतराव नाईक, ना. श्री वसंतदादा पाटील, ना. शरदराव पाटील, ना. बॅरिस्टर ए.आर. अंतुले यांनी वेळोवेळी आपल्या मुख्यमंत्री निधीतून कॉलेजला अर्थसहाय्य दिले. जनतेकडून आर्थिक मदत मिळू लागली. विद्यार्थी संख्येत वाढ होऊ लागली. तसेच नवे अभ्यासक्रम सुरू केले. आज महाविद्यालयात तीन विद्याशाखा व पदव्युत्तर वर्ग सुरू आहेत. त्यामुळे प्राध्यापक वृंद यांची संख्या वाढली. शैक्षणिक कार्य अत्यंत चांगल्या पध्दतीने सुरू आहे.

कॉलेजची स्वतःची भव्य वास्तु आसावी म्हणून संस्थेने प्रयत्न करून शासनाकडून जमीन मिळवली. नवीन इमारतीचा पाया भरला व भव्य वास्तुचे स्वप्न साकार झाले. पुढे विद्यापीठ अनुदान आयोगाने इमारतीसाठी २ लक्ष ४८ हजार रूपयाचे अनुदान दिले. त्यामुळे सुसज्ज भव्य इमारत उभारली. महाविद्यालयात १९६६ साली वाणिज्य विभाग व १९७२ साली विज्ञान विभाग तसेच १९७३ साली इतिहास पदव्युत्तर विभाग, १९९१-९२ पासून नियमित पदव्युत्तर वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र हे अभ्यासक्रम सुरू केले होते. तसेच २००४-०५ साली पदव्युत्तर समाजशास्त्र या विषयाची मान्यता घेतली. शै. वर्ष २००६ , २००७ मध्ये स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड यांनी इतिहास संशोधन केंद्रास मान्यता दिली. बहिस्थ शिक्षणाच्या सोयीसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे अभ्यासकेंद्र सुरू केले. तसेच मुक्त विद्यापीठाचे बी.एस्स.सी. व एम.कॉम, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केले. विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय स्थापन करून या ग्रंथालयात ५६००० ग्रंथ संपदा उपलब्ध आहेत. व ग्रंथालयाच्या संगणकीकरणाचे काम सुरू आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू या भाषचे एकूण २८ दैनिक व ३६ साप्ताहिके व नियतकालिके महाविद्यालयात नियमितपणे येतात. ग्रंथालयात अनेक दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध आहेत. याचबरोबर एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी. स्पर्धात्मक परीक्षासाठी ग्रंथ उपलब्ध करून दिले आहेत.

श्री शिवाजी कॉलेज कंधार गेल्या ६६ वर्षापासून गोरगरीब मुलांसाठी व मुलींसाठी त्यांच्या कौटूंबिक, आर्थिक, सामाजिक, वैचारीक, शैक्षणिक विकासासाठी अनेक समस्यांना तोंड देत शिक्षण सेवेचे कार्य अविरतपणे व प्रभावीपणे सुरू आहे. महाविद्यालयात १९६३ पासून एन.सी.सी. विभाग व एन.एस.एस. विभाग तसेच क्रीडा विभाग व सांस्कृतिक विभाग प्रभावीपणे सुरू असून या भागातून अनेक विद्यार्थी याचा फायदा घेऊन नोकरीमध्ये रुजू झाले आहेत. या महाविद्यालयात अनुभवी तज्ञ प्राध्यापक तसेच संशोधक, मार्गदर्शक वृंद कार्यरत आहेत. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी संस्थेच्या सन्माननीय पदाधिकारी सातत्याने मार्गदर्शन करत असतात. त्यासाठी महाविद्यालय कटीबध्द आहे.
जयक्रांति ।

**प्रो.डॉ. एस.एम. जोगदंड**
प्रभारी प्राचार्य
श्री शिवाजी कॉलेज कंधार

# रॅगिंग प्रतिबंधक नियम

**रॅगिंगच्या प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी 'रॅगिंग प्रोहिबीशन ॲक्ट १९९९' लागू करण्यात आलेला आहे. या कायद्यानुसार शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस शारिरीक किंवा मानसिक हानी पोहोंचविणे, तशी शक्यता निर्माण करणे, विद्यार्थ्यांत चिंतेची, भितीची, लज्जेची किंवा अडचणीची भावना निर्माण करणे, गैरवर्तणुकीचे प्रदर्शन करणे, चिडविणे, शिवीगाळ करणे, धमकी देणे. अनिच्छेने एखादी कृती करण्यास भाग पाडणे अशी रॅगिंगची व्याख्या करण्यात आलेली आहे.**

प्रत्यक्ष रॅगिंग करणे किंवा त्यास प्रेरणा देणे आदींना या कायद्यातील तरतुदी नुसार बंदी घालण्यात आलेली आहे. नविन नियमानुसार महाविद्यालयातून २ वर्ष काढून टाकणे व अन्य संस्थेमध्ये प्रवेश घेण्यास मनाई करण्यासारख्या शिक्षांची तरतूद करण्यात आली आहे.

## विद्यार्थीनी सुरक्षितता समिती

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. सी.एन. हनुमंते | ८४८४९५३७२३ |
| २) | डॉ. एम.आर. कदम | ९८३४८२३२५५ |
| ३) | डॉ. एस.पी. गुट्टे | ८३२९८३६६०२ |
| ४) | डॉ. व्ही.के. साखरे | ९८९०७४९४४३ |

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान साह्यता केंद्रामार्फत चालवल्या जाणाऱ्या करीअर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्याच्या सर्वांगिण विकासासाठी महाविद्यालयात राबवला जातो. त्यामार्फत विद्यार्थी आय.ए.एस. (I.A.S.) व मोठ्या उद्योजकासोबत संवाद साधुन मार्गदर्शन घेतात.

महाविद्यालयात एन.पी.टी.एल. (N.P.T.L ) SWAYAM व M.K.C.L चे ऑनलाईन क्रेडीट कोर्सेस करण्यासाठी विद्यार्थ्यांना सुसज्ज संगणेक कक्ष उपलब्ध आहे. एन.पी.टी.ई.एल. (N.P.T.L ) च्या कोर्सेस मध्ये आय.आय.टी. च्या नामांकित महाविद्यालयाच्या संगणक कक्ष व इंटरनेट सुविधेच्या माध्यमातून उपलब्ध आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, इंग्रजी विषयाचे स्पोकन क्लासेस मधून केंद्रीय विद्यापीठ व नामांकित संस्थाचे मोफत कोर्ससाठी प्राध्यापकाचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळते.

### प्रवेशसाठी आवश्यक कागदपत्रे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | टी.सी. ( मुळ ) ( झेरॉक्स प्रती - ३) | २) | मार्क मेमो - ( झेरॉक्स प्रती - ३) |
| ३) | जातीचे प्रमाणपत्र ( झेरॉक्स प्रती - ३) | ४) | आधार कार्ड ( झेरॉक्स प्रती - ३) |
| ५) | दोन पासपोर्ट फोटो | ६) | ए.बी.सी.आय.डी. ( झेरॉक्स प्रती - १) |
| ७) | शैक्षणिक खंड असेल तर गॅप सर्टीफिकेट | | |

#### आरक्षण विषयक टक्केवारी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | ओ.बी.सी. | १९ टक्के | २) | एस.बी.सी. | ०२ टक्के |
| ३) | एस्स.सी. | १३ टक्के | ४) | एस.टी. | ०७ टक्के |
| ५) | व्ही.जे.एन.टी. | ११ टक्के | | | |

# विवध अभ्यासक्रम व विषय

ज्युनिअर कॉलेज

**ज्युनियर कॉलेज**

**कला व सामाजिक शास्त्रे, विज्ञान व वाणिज्य विद्याशाखा:**

**अनिवार्य विषय :**

१. इंग्रजी २. द्वितीय भाषा मराठी / हिंदी / संस्कृत (या पैकी कोणतीही एक) ३. शारीरिक शिक्षण ४. पर्यावरण

**ऐच्छिक विषय : कला व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा**

१. अर्थशास्त्र / सहकार २. इतिहास ३. राज्यशास्त्र / भुगोल ४. समाजशास्त्र

टीप : ऐच्छिक विषयात किमान २० विद्यार्थी असणे अनिवार्य आहे.

**वाणिज्य विद्याशाखा**

१. अर्थशास्त्र / सहकार २. व्यापार संघटण ३. सचिवाची कार्यपध्दती ४. पुस्तपालण व लेखाकर्म

**विज्ञान विद्याशाखा:**

१. भौतिकशास्त्र २.रसायनशास्त्र ३. जीवशास्त्र / इलेक्ट्रीक मेन्टनन्स

४. गणित / पीक उत्पादन / समाजशास्त्र ५. Biofocal / Vocational

*** महाविद्यालयामध्ये वासंतिक वर्गाची सोय आहे तसेच MH-CET (Medical) व JEE(Engineering) परीक्षेची विशेष तयारी वर्ग घेतले जातात.**

**(सन २०१४-१५ मध्ये ज्युनियर कॉलेजचा एकूण निकाल ९४.५९ लागला असून कला- ८३.९२ वाणिज्य- ८८.२३ व विज्ञान- ९५.४५ टक्के लागला आहे.)**

टीप : वरील पैकी कोणतेही चार विषय घ्यावे लागतील समाजशास्त्र विषय गणित विषय वगळून घेता येईल.

११ वी विज्ञान प्रवेश घेण्यासाठी एस. एस. सी परीक्षेत विज्ञान विषयात ४० टक्के गुण असणे आवश्यक आहे.

१) भौतिकशास्त्र २) रसायनशास्त्र ३) जीवशास्त्र ४) गणित ५) समाजशास्त्र

## ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक वृंद

| | | | |
|---|---|---|---|
| 1. प्रा. राठोड बी.डी. | समाजशास्त्र | 13. प्रा. किडे जी.डी. | हिंदी |
| 2. प्रा. लिंगायत ए.बी. | अर्थशास्त्र | 14. प्रा. माने व्ही.व्ही. | राज्यशास्त्र |
| 3. प्रा. कल्याण कस्तुरे जी.एम. | भौतिकशास्त्र | 15. प्रा. हिप्पळगावे व्ही.जी. | भौतिकशास्त्र |
| 4. प्रा. ब्याळे एम.के. | इंग्रजी | 16. प्रा. कॅंदरकुंटे एस.व्ही. | वाणिज्य विभाग |
| 5. प्रा. वाडकर एच.टी. | इतिहास | 17. प्रा. मिसे एम.एल. | जिवशास्त्र |
| 6. प्रा. गरूडकर प्रदीप प्रभाकर | जिवशास्त्र | 18. प्रा. पवार एस.जी. | रसायनशास्त्र |
| 7. प्रा. वाघमारे एस.व्ही. | मराठी | 19. प्रा. बारसे जे.एस. | गणित |
| 8. प्रा. सुर्यवंशी डी. व्ही. | समाजशास्त्र | 20. प्रा. अडकिणे आर. बी. | हिंदी |
| 9. प्रा. मोरे जी.बी. | अर्थशास्त्र | 21. प्रा. जोगदंड आर.आर. | जिवशास्त्र |
| 10. प्रा. केरले एस.जी. | गणित | 22. प्रा. कुरूंदे पी.एन. | भौतिकशास्त्र |
| 11. जामगे व्ही. ई. | इतिहास | 23. प्रा. सोनकांबळे के.व्ही. | क्रिडा व शारीरिक शिक्षण |
| 12. प्रा. देशमुख एस.एस. | रसायनशास्त्र | 24. प्रा. कोरे पी.एस. | इंग्रजी |

## वरीष्ठ महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर प्राध्यापक वृंद

### इतिहास विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा. डॉ. व्ही. के. साखरे | | एम.ए. ( इतिहास ), एम.एड.(संशोधक मार्गदर्शक) एम.फिल. पीएच.डी. |
| 2. | प्रा.डॉ. एस.आर. रगडे | मो.9881772851 | एम.ए. ( इतिहास ), पीएच.डी |

### लोकप्रशासन विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.डॉ. एस.पी. गुट्टे | मो. 8329836602 | एम.ए.(लोकप्रशासन ), नेट |

### शारीरिक शिक्षण विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.डॉ.सी.एन. हनुमंते | | एम.पी.एड., एम.फिल, पीएच.डी. |

### समाजशास्त्र विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.डॉ. एन.आर. कांबळे | मो. 8788971821 | एम.ए. (समाजशास्त्र ) एम.एस.डब्ल्यु,नेट,सेट, पीएच.डी., |

### इंग्रजी विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.डॉ के.एस.आगे | मो. 9975136811 | एम.ए., पीएच.डी. |

### मराठी विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रो. डॉ. डी.एस. सावंत | मो. 9860599061 | एम.ए., पीएच.डी. (संशोधक मार्गदर्शक) |
| 2. | प्रा.डॉ. उमेश भ. पुजारी | मो. 8668583339 | एम.ए., पीएच.डी. (संशोधक मार्गदर्शक) |

### अर्थशास्त्र विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रो.डॉ. व्ही.टी. ठाकूर | मो. 9421764294 | एम.ए., सेट, पीएच.डी. (संशोधक मार्गदर्शक) |
| 2. | प्रा. डॉ एस.डी.भागानगरे | मो. 8329104130 | एम.ए., पीएच.डी. (संशोधक मार्गदर्शक) |

### राज्यशास्त्र विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.डॉ. एम.आर. कदम | मो. 9766557758 | एम.ए., नेट, पीएच.डी. (संशोधक मार्गदर्शक) |
| 2. | प्रा.डॉ. एम.एस. शिंदे | मो. 9960119351 | एम.ए., पीएच.डी. |

### वाणिज्य विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.डॉ. एस.पी. राठोड | मो. 7020783406 | एम.कॉम.,एम.फिल., पीएच.डी. एम.बी.ए. नेट, सेट |
| 2. | प्रा. ए.बी. रिंदगवाले | मो. 9673272160 | एम.कॉम, पीएच.डी. |

### प्राणीशास्त्र विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.डॉ. शेख मेहराज | | एम.एस्सी., पीएच.डी. |
| 2. | प्रा. डी. डब्लू कनाके | | एम.एस्सी., |

### वनस्पतीशास्त्र विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.डॉ. के.एम. शेंडगे | मो. 9420847632 | एम.एस्सी., पीएच.डी. |
| 2. | प्रा.डॉ. आर. एच. इंगळे | मो.9325755573 | एम.एस्सी., पीएच.डी. |
| 3. | प्रा. एम.एम. पेटकर | मो.9595068805 | एम.एस्सी., सेट. |

### रसायनशास्त्र विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.डॉ. एस.एस. चिवटे | मो. 9970281437 | एम.एस्सी., पीएच.डी. |
| 2. | प्रा. व्हि.पी. बावनथडे | | एम.एस्सी., सेट. |
| 3. | प्रा. आर.बी. गोरे | मो. 9604955804 | एम.एस्सी., नेट. |

### भौतिकशास्त्र विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा. यु.एस. चोंडे | मो. 9823505644 | एम.एस्सी. |
| 2. | प्रा.डॉ. एस.के. जोगदंड | | एम.एस्सी., पीएच.डी. |

### गणित विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रा. डॉ. एस.एम. जोगदंड | मो.9423138679 | एम.एस्सी. पीएच.डी. (संशोधक मार्गदर्शक) |
| 2. | प्रा. डॉ. जी.सी. डोणे | मो. 9881982017 | एम.एस्सी. पीएच.डी. |

**पदव्युत्तर विभाग - एम.एस्सी. प्राणिशास्त्र व एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र ( विनाअनुदानीत )**
**एम.ए. इतिहास ( अनुदानीत ) व एम.ए. समाजशास्त्र ( विनाअनुदानीत )**

Academic Year 2025-26

**Admission open for following Degree Programmes**

## B. Sc. First Year

खालीलपैकी एक ग्रुप निवडावा

| Group | Subject | | |
|---|---|---|---|
| I | Physics | Chemistry | Mathematics |
| II | Chemistry | Botany | Zoology |
| III | Agrochemicals & fertilizers | Botany | Zoology |
| IV | Physics | Mathematics | Electronics |
| V | Physics | Chemistry | Electronics |

## B. Com. First Year

| Sr. No. | Subject |
|---|---|
| 1 | Financial Accounting |
| 2 | Business Economics |
| 3 | Business Mathematics & Statistics |

## B. A. First Year

खालील पैकी एक ग्रुप निवडावा

| Group | विषय | | |
|---|---|---|---|
| A | हिंदी | इतिहास | अर्थशास्त्र |
| B | हिंदी | राज्यशास्त्र | शारीरिक शिक्षण |
| C | मराठी | इतिहास | लोकप्रशासन |
| D | मराठी | समाजशास्त्र | राज्यशास्त्र |
| E | English | इतिहास | अर्थशास्त्र |
| F | English | लोकप्रशासन | समाजशास्त्र |
| G | उर्दू | समाजशास्त्र | शारीरिक शिक्षण |

## B. A./ B. Com./B. Sc. द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विध्यार्थ्यांना महत्वाची सूचना

1. B. A. / B. Com. / B . Sc . द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी (प्रथम वर्षात ) निवडलेल्या तीन विषयांपैकी एक विषय Major (मेजर) व एक विषय Minor ( मायनर ) म्हणून निवडावा व ग्रुप मधील तिसरा विषय निवडण्याची गरज नाही
2. एक विषय Major (मेजर) व एक विषय Minor ( मायनर ) निवडल्यानंतर खालील 5 विषय देखील निवडणे बंधनकारक आहे. खालील सर्व विषय प्रवेश फॉर्म मध्ये लिहावे

| Sr. No. | Subject | Subject |
|---|---|---|
| 1 | AEC | English ( First Language) |
| 2 | MIL | Marathi / Hindi /Urdu ( Second Language) |
| 3 | SEC | Select from any one Subject from Major or Minor /मेजर व मायनर पैकी एका विषयाचे SEC निवडावे. |
| 4 | GE | Generic Elective ( From other Faculty) आपली शाखा सोडुन महाविद्यालयात उपलब्ध असलेला इतर शाखेचा विषय निवडणे. |
| 5 | CC | NCC / NSS/ SPT(Sports) / CLS(Cultural Studies) / FIT(Fitness) / YOGA |

### प्रवेश अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे

१. शाळा सोडल्याचा दाखला (टी. सी. ) ची मूळप्रत व त्याच्या 3 xerox प्रती
२. १२ वी /मागील वर्षाची गुणपत्रिका व त्याच्या 3 xerox प्रती
३. जातीचे प्रमाणपत्र ( आवश्यकता असल्यास ) व त्याच्या 3 xerox प्रती
४. पासपोर्ट आकाराचे 2 फोटो
५. ABC ID / APAAR ID xerox प्रत

### उपक्रम व सोयी

1. राष्ट्रीय छात्र सेना ( NCC)
2. राष्ट्रीय सेवा योजना (NSS)
3. सांस्कृतिक विभाग, संगणक कक्ष
4. करिअर कट्टा अंतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
5. विविध क्रीडा स्पर्धा मैदाने व जिमची सोय
6. सुसज्ज ग्रंथालय व बुक बँक योजना
7. विविध विषयांच्या अभ्यास सहली
8. NPTEL, SWAYAM द्वारे ऑनलाईन क्रेडिट कोर्सेस



भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहणावेळी एन.सी.सी. चे कॅडेट रायफल सलामी देत असताना



संस्थेचे संस्थापक व संचालक डॉ. भाई केशवरावजी धोंडगे साहेब यांच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त एन.सी.सी. विभागाच्या वतीने महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन



५२ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. नांदेडचे मा. कर्नल एम.रंगाराव यांची महाविद्यालयास नविन विद्यार्थ्यांच्या प्रवेशा प्रसंगी सदिच्छा भेट व स्वागत करताना प्राचार्य एस.एम. जोगदंड




भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहणावेळी एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांची सैन्य व पोलीसपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार करत असताना श्री माधवराव पेटकर, प्राचार्य एस.एम.जोगदंड व कॅप्टन डॉ. दिलीप सावंत

## कार्यालयीन कर्मचारी वृंद

1. श्री एच.एन. इंगळे -अधिक्षक
2. श्री एम.एम. पेटकर -मुख्य लिपीक
3. श्री जे.बी. पंढरे -वरिष्ठ लिपीक
4. श्री आर.व्ही. जोगदंड -कनिष्ठ लिपीक
5. श्री टी.डी. आगलावे -कनिष्ठ लिपीक
6. श्री व्ही.एन. कांबळे -प्रयोगशाळा सहाय्यक
7. श्री के.आर. वरपडे -प्रयोगशाळा सहाय्यक
8. श्री व्ही.एस.डी. फुले -प्रयोगशाळा सहाय्यक

## शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

1. श्री टी.के. गिरे -प्रयोगशाळा परिचर
2. श्री एस.के. आईनवार- प्रयोगशाळा परिचर
3. श्री एन.पी. कुरुंदे - प्रयोगशाळा परिचर
4. श्री एस.एम. गरुडकर- प्रयोगशाळा परिचर
5. श्री डी.बी. गुंजाळे - प्रयोगशाळा परिचर
6. श्री बी.के. मुंडे - प्रयोगशाळा परिचर
7. श्री शेख जाकेर हुसेन - प्रयोगशाळा परिचर
8. श्री आर. एन. गायकवाड- प्रयोगशाळा परिचर
9. श्री बी.एस. नखाते- ग्रंथालय परिचर
10. श्री जी. आर. जाधव - ग्रंथालय परिचर
11. श्री आर.एम. देशमुख - ग्रंथालय परिचर
12. श्रीमती एस.आर. शेंडगे - सेवक



मौजे पांगरा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे निवासी विशेष युवक शिबिर २०२३ उद्‌घाटन प्रसंगी संस्थेचे सहसचिव ॲड. मुक्तेश्वरराव धोंडगे मार्गदर्शन करत असताना




मौजे पांगरा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे निवासी युवक शिबिर २०२३ च्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष कॅप्टन डॉ.दिलीप सावंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना



स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड ब झोन विभागीय कुस्ती स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी संस्थेचे सचिव मा. गुरुनाथराव कुरूडे साहेब व संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ. पुरूषोत्तमरावजी धोंडगे साहेब



कै. तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती येथे आंतर महाविद्यालयीन योगा स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ.पुरूषोत्तम धोंडगे यांच्या हस्ते खेळाडूंचे स्वागत

## भारत सरकार शिष्यवृत्ती

शासनाच्या नियमानुसार पात्र विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो. त्यासाठी खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकाचे लगतच्या वर्षातील उत्पन्न रु.२,५०,००० च्या आत असावे.

२. इ.मा.व., वि.जा.भ.ज. व वि.मा.प्र. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकाचे लगतच्या वर्षातील उत्पन्न रु.१,५०,००० च्या आत असावे.

३. शिष्यवृत्ती मंजुरीसाठी उत्पन्नाचे प्रमाणपत्रावर तहसिलदाराची स्वाक्षरी अवश्यक.

४. शिष्यवृत्ती ऑनलॉन असल्यामुळे विद्यार्थ्यांनी राष्ट्रीयकृत बँकेत आधारकार्ड संलग्नित खाते उघडणे आवश्यक आहे.

५. ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी.. या संकेतस्थळावर विहीत मुदतीत शिष्यवृत्तीफॉर्म भरणे आवश्यक आहे.

६. प्रवेश पुर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी विहित मुदतीच्या आत शिष्यवृत्तीफॉर्म भरणे आवेदनपत्र भरुन त्याची प्रत कागदपत्रांसह कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

७. शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर विद्यार्थ्याच्या खात्यावर सरळ जमा करण्यात येते.

## ई.बी.सी. सवलत

शासनाच्या नियमानुसार आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ई.बी.सी.) योजनेचा लाभ देण्यात येतो. त्यासाठी खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. ई.बी.सी. सवलत मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न रु.८,००,०००/- पेक्षा जास्त नसावे.

२. उत्पन्नाचे प्रमाणपत्र संबंधीत विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्या स्वाक्षरीचे असावे.

३. अपत्य प्रमाणपत्र आवश्यक आहे.

४. प्रवेश पूर्ण झाल्याबरोबर विहित मुदतीच्या आत विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या www.mahabdt.gov.in या संकेत स्थळावर भरुन त्याची प्रत कागदपत्रांसह कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.




स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेडचा ज्ञानतीर्थ युवक महोत्सव २०२३ मध्ये मा. कुलगुरू डॉ. उध्दव भोसले यांच्या हस्ते पारितोषक स्वीकारत असताना सांस्कृतिक विभागाचे कलावंत



स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेडचा ज्ञानतीर्थ युवक महोत्सव २०२३ मध्ये उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाच्या यशस्वी शोभायात्रेत सहभागी विद्यार्थी

## स्थानिक व्यवस्थापन मंडळ

## शिवाजी कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स,

### कंधार ता. कंधार जि. नांदेड

---

## स्थानिक व्यवस्थापक मंडळ

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. प्रा. डॉ. पुरुषोत्तमराव केशवराव धोंडगे | अध्यक्ष |
| 2. | मा. श्री गुरूनाथराव माणिकराव कुरूडे ( माजी आमदार ) | सदस्य |
| 3. | मा.श्री मकबुल अहेमद मसुद अहेमद साहेब | सदस्य |
| 4. | मा. प्रो.डॉ. दिलीप सावंत | प्राध्यापक प्रतिनिधी |
| 5. | प्रा.डॉ. साखरे व्ही.एन. | प्राध्यापक प्रतिनिधी |
| 6. | मा. एच.एन. इंगळे | प्रतिनिधी |
| 7. | मा. प्राचार्य डॉ. सुर्यकांत जोगदंड | सचिव पदसिध्द |



महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांच्या वतीने स्व्छता मोहिमेची तयारी



आंतरराष्ट्रीय स्वच्छता दिनानिमित्त मौजे नवरंगपुरा येथे महाविद्यालयातील रा.से.यो. विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी स्वच्छता करत असताना




आजादी का अमृत महोत्सव निमित्ताने स्वा.रा.ती.म. विद्यापीठाच्या मशाल रॅलीचे स्वागत प्रसंगी रा.से.यो.विभागाचे कार्यक्रमाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी स्वयंसेवक




राष्ट्रीय सेवा योजना व एन.सी.सी. विभागाच्या वतीने भारतीय संविधान दिन सांजरा करत असताना लेप्ट. डॉ. दत्तराम रगडे, प्रा. डॉ.संतोष गुट्टे व विद्यार्थी

# संस्थेचे विविध उपक्रमातील क्षणचित्रे



संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. भाई पुरूषोत्तमरावजी धोंडगे यांच्या सामाजिक कार्याबद्दल व्हीजन २०२३ हा पुरस्कार मिळाल्याबद्दल नांदेड येथे संस्थेच्या वतीने सहपत्नीक स्वागत करीत असताना



संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. भाई पुरूषोत्तमरावजी धोंडगे यांच्या सामाजिक कार्याबद्दल व्हीजन २०२३ हा पुरस्कार मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस साहेब यांच्या हस्ते स्विकारताना.



२९ व्या जागतिक गुराखी साहित्य संमेलन किरोडा येथे उपस्थित गुराखी कलावंताचे स्वागत करीत असताना स्वागताध्यक्ष डॉ. भाई पुरूषोत्तमरावजी धोंडगे साहेब



हैद्राबाद मुक्ती लढ्यातील शुर हुतात्म्यांच्या नातेवाईकांचा संस्थेच्या वतीने सत्कार करीत असताना मौजे कल्हाळी येथील रणयात्रेत संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी



मातोश्री मुक्ताई धोंडगे स्मृती दिनानिमित्त महाविद्यालयात सनदी अधिकारी मा.अनिल मोरे व ज्येष्ठ माजी नगराध्यक्ष मा.रामराव पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करीत असताना



श्री शिवाजी कॉलेज कंधार येथे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. डी.एन. मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पदवी वितरण समारंभ



श्री शि.मो.एज्यु.सोसायटीच्या सर्व शाखेतील १० वी व १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांची शर्करातुला



श्री शि.मो.एज्यु.सोसायटीतील सर्व शाखेच्या वतीने सार्वत्रिक शिवजयंती महोत्सवाची मिरवणूक

# महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाचे क्षणचित्रे







स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड विद्यार्थी विकास विभाग आयोजित शिवराज्याभिषेक ३५० विभागीय



२१ व्या जागतिक गुराखी साहित्य संमेलनात डॉ. भाई केशवराव धोंडगे साहेब यांच्या



स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेडच्या ज्ञानतीर्थ युवक महोत्सव २०२३ मध्ये मान्यवरांच्या हस्ते कलात्मक युवकांचे पारितोषिक स्विकारताना प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी



स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेडच्या ज्ञानतीर्थ युवक महोत्सव २०२३ मध्ये आंबेडकरी प्रबोधनात्मक जलसा सादर करीत असताना विद्यार्थी कलावंत.

पोवाडा स्पर्धेतील तृतीय पारितोषिक मा. प्र. कुलगुरू डॉ.माधुरी देशपांडे यांच्या हस्ते स्विकारताना

जीवनकार्याची ओळख हा पोवाडा सादर करीत असताना विद्यार्थी.



स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड विद्यार्थी विकास विभाग आयोजित शिवराज्याभिषेक ३५० विभागीय पोवाडा स्पर्धेत छ.शिवाजी महाराज शिवराज्याभिषेक सोहळा हा पोवाडा सादर करीत असताना



कै. बापूसाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील पारितोषिक स्विकारताना अंश कुमार, प्रिया कदम, डॉ. दिलीप सावंत

# श्री शिवाजी कॉलेज ऑफ आर्ट, कॉमर्स अँड सायन्स, कंधार



महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सार्वभौम सभागृहात मुंबई येथे मुख्यमंत्री मा.ना.एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब व विधानसभा अध्यक्ष मा.डॉ.राहुलजी नार्वेकर यांच्या हस्ते माजी खासदार व आमदार डॉ.भाई केशवरावजी धोंडगे साहेब यांचा शतकोत्सवी वर्षा निमित्त संसदीय व सामाजिक कार्याचा गौरव – दिनांक : २४/०८/२०२२.

महाविद्यालयाची भव्य इमारत



